# प्रसिध्दीपत्रक

सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेल्या तसेच इतर कंत्राटी स्वरुपात कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवा नियमित करुन देण्याचे खोटे आमिष दाखवून कंत्राटी कर्मचारी वर्गाकडून पैश्याची मागणी करण्यात येत असल्याबाबत शासनास व या कार्यालयास वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितीतल "गट क" व "गट ड" या संवर्गातील पदे त्या त्या पदांचे सेवा प्रवेश नियम व शैक्षणिक अर्हतेनुसार जाहिरात प्रसिध्द करुन लेखी परीक्षेचें आयोजन करुन गुणवत्तेनुसार विहित मार्गाने भरण्यात येतात. सार्वजनिक आरोग्य विभागातील "गट क" व "गट ड" या संर्वगातील सेवा प्रवेश नियमात कंत्राटी/अस्थायी/तात्पुरत्या स्वरुपात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना पदभरतीमध्ये प्राधान्य देण्याची अथवा त्यांना थेट नियुक्ती देण्याची तरतुद नाही. तसेच केवळ कंत्राटी/तात्पुरत्या स्वरुपात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना कोणतीही प्रवेश परीक्षा न घेता व विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता शासन सेवेत नियमित स्वरुपात थेट नियुक्ती दिल्या जात नाही. आरोग्य सेवेत केवळ विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्या त्या पदांसाठी विहित केलेल्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसारच परीक्षा देऊन सरळसेवेने नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे अशा खोटया आमिषांना बळी न पडता विहित पध्दतीचा अवलंब करुनच उमेदवाराने पदभरतीमध्ये सहभाग नोंदवावा.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवा नियमित करुन देण्याचे खोटे आमिष दाखवून जर कोणी पैश्याची मागणी करीत असेल तर सदर आमिषांस बळी न पडता त्याबाबत रीतसर संबंधीताविरुध्द पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवीण्यात यावी. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी सेवेतील कर्मचारी तसेच इतर राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांची सेवानियमानाच्या नावाखाली फसवणूक होऊ नये व सदर फसवणुकीस आळा घालण्याच्या उद्देशाने सदर प्रसिध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नांदेड.